# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०१७ / फाल्गुन २५, १९३८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास आणि वक्फ मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री** | |
| **(३)** | **पर्यावरण मंत्री** | |
| **(४)** | **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३५**

---

### मौजे सर्जेकोट मिऱ्याबांदा (ता.मालवण,जि.सिंधुदुर्ग) येथील नळपाणीपुरवठा योजनेबाबत

**(१) * ७५९९४ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सर्जेकोट मिऱ्याबांदा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या गावात कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याची समस्या असल्याने ग्रामस्थांना दरवर्षी जानेवारी ते जून या कालावधीत विहिरीतील खारे पाणी प्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावातील ग्रामस्थांच्या मागील अनेक वर्षापासून कायम स्वरूपी नळपाणी पुरवठा योजना लागू करण्याच्या मागणीनुषंगाने शासनाने सन २००९-२०१० मध्ये भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत योजनेस मंजूरी दिलेली असतानाही आजमितीस सदरहू योजनेस सुरूवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्या अस्तित्त्वात असलेल्या नळपाणीपुरवठा योजनेच्या जिर्ण पाईप लाईनमुळे अनियमित व अत्यल्प पाणी पुरवठा होत असल्याने सदर योजनेसाठी १४ व्या वित्त आयोगांतर्गत दुरूस्तीसाठी १ लाख ६० हजार रूपये इतक्या रक्कमेची तरतूद केलेली असतानाही उक्त योजनेच्या दुरूस्तीच्या कामास सुरुवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त नळपाणी पुरवठा योजनेच्या कामास सुरूवात न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उक्त योजनेचे काम कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.
सदर गावात २ सार्वजनिक विहीरी असून सदर विहीर खाडीनजीक असल्याने त्यातून मिळणारे पाणी काही प्रमाणात खारे होते.
(२) नाही.

सन २००८-०९ मध्ये भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत योजना मंजूर करण्यात आली असून योजनेच्या कामास सुरुवात करण्यात आली होती. सदर योजनेचा उद्भव कांदळगाव ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रामध्ये गोड्या पाण्याच्या ठिकाणी खोदण्यात येत होता. तथापि या जागेच्या मालकीबाबत कांदळगाव येथील ग्रामस्थाने मा. न्यायालयामध्ये दिवाणी दावा दाखल केल्याने कांदळगाव ग्रामपंचायतीने विरोध केल्याने मिऱ्याबांदा ग्राम पाणीपुरवठा समितीने सदर योजनेचे काम बंद केले आहे.
(३) सध्या अस्तित्वात असलेल्या योजनेच्या दुरुस्तीसाठी १४ व्या वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायत मिऱ्याबांदा यांना सन २०१६-१७ मध्ये रुपये २.२० लाख इतकी रक्कम प्राप्त असून सदर कामाच्या निविदा प्रक्रियेची कार्यवाही ग्रामपंचायत स्तरावर सुरु आहे.
(४) सन २००८-०९ मध्ये भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत योजना मंजूर करण्यात आली असून योजनेच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे. सदर योजनेचा उद्भव कांदळगाव ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रामध्ये गोड्या पाण्याच्या ठिकाणी खोदण्यात येत होता. तथापि या जागेच्या मालकीबाबत कांदळगाव येथील

ग्रामस्थाने मा. न्यायालयामध्ये दिवाणी दावा दाखल केला होता. तसेच सदर कामास कांदळगाव ग्रामपंचायतीने विरोध केल्याने मिऱ्याबांदा ग्राम पाणीपुरवठा समितीने काम बंद केले आहे.

(५) सदर योजनेबाबत ग्रामपंचायत कांदळगाव येथे सभा घेण्यात आली असून न्यायालयीन बाब मिटलेली असल्यामुळे योजना कार्यान्वित करण्याच्या सूचना जिल्हा परिषदेकडून ग्रामपंचायतीला देण्यात आल्या आहेत.

-----------------

## तळोजा (ता.पनवेल) एमआयडीसीमधील कारखान्यांनी रसायनमिश्रीत पाणी कासाडी नदीत सोडल्यामुळे झालेले प्रदूषण

**(२) * ७५०७४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) एमआयडीसीमधील कारखान्यांनी रसायनमिश्रीत पाणी कासाडी नदीत सोडल्यामुळे रोडपालीच्या परिसरातील खाडीचा काही भाग पूर्णपणे काळा होवून रासायनमिश्रीत पाण्यामुळे मॅंग्रोस व मासे तसेच जलचरांवर परिणाम झाला असून पाण्याच्या उग्र वासामुळे कामोठे रोडपाली परिसरात दुर्गंधी पसरल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारखान्यांमुळे जलप्रदूषणात वाढ होत असल्याने कारखान्यांचा ४० टक्के पाणी पुरवठा माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान बंद करण्यात आला आहे तसेच ज्या कारखान्यांची सामुहीक सांडपाणी प्रक्रिया केंद्राची क्षमता २५ एमक्यूबपेक्षा अधिक आहे अशा कारखान्यांनी प्रदूषणासंदर्भातील ऑनलाईन मॉनिटरिंग सिस्टिम बसविण्याची सूचनाही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात प्रदुषण महामंडळाकडे वारंवार निदर्शनास आणून सुद्धा कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त कारखान्यांवर व प्रदुषण महामंडळाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, कारवाईचे स्वरूप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अशंत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेतून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची गुणवत्ता विहित मर्यादेत नसल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून फेब्रुवारी, २०१७ मध्ये प्रथम न्यायाधिकारी, पनवेल यांच्या न्यायालयात फौजदारी दावा दाखल करण्यात आला आहे.

जून २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत सामुहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेच्या गुणवत्तेवर परिणाम करणा-या ६ उद्योगांना बंदचे आदेश, १८ उद्योगांना अंतरिम आदेश व ३४ उद्योगांना प्रस्तावित निर्देश देण्यात आलेले आहेत.

सामुहिक प्रक्रिया सयंत्रणेच्या गुणवत्तेवर परिणाम करणा-या दोषी उद्योगांचे ४० टक्के पाणी कपात करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहे. त्याचबरोबर २५ घनमीटर/प्रतिदिन पेक्षा जास्त औद्योगिक सांडपाणी निर्माण करणा-या उद्योगांच्या प्रक्रियाकृत सांडपाण्याची गुणवत्ता अविरत मोजण्यासाठी ३९ उद्योगांना ऑनलाईन मॉनिटरींग सिस्टीम बसविण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बारव्हा (ता. लाखांदूर, जि. भंडारा) येथील नळयोजनेच्या जीर्ण पाईपलाईनमधून अशुद्ध पाणी पुरवठा होत असल्याबाबत**

**(३) * ७४८२१ श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारव्हा (ता. लाखांदूर, जि. भंडारा) येथील नळयोजनेतून अशुद्ध पाणी सोडले

जात असून ७-८ वर्षापुर्वीच्या सदर नळयोजनेच्या जीर्ण पाईपलाईन मधूनही अशुद्ध पाण्यातून नारुसारखे जंतू वाहून येत असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त जिल्ह्यातील जुन्या झालेल्या नळयोजनेतील पाईपलाईन बदलण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच याकामाकरिता विशेष निधीची तरतुद करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.
सदर योजनेची पाईपलाईन व्यवस्थित असून, पाणी पुरवठा सुरळीत सुरु आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिक्षणाधिकारी, जि.प. ठाणे यांनी चुकीची बिंदूनामावली तयार करुन अनुसूचित जमातीच्या शिक्षकांना अतिरिक्त ठरविल्याबाबत

**(४) * ७९७१७ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी, जि.प. ठाणे यांनी विभागीय आयुक्त कोकण भवन यांचेकडून अनुसूचित जमातीची बिंदूनामावली तयार न करता, चुकीची बिंदूनामावली तयार करुन व अनुसूचित जमातीच्या अनेक शिक्षकांना अतिरिक्त ठरवून त्यांचे समायोजन करण्याचा चुकीचा व नियमबाह्य निर्णय घेतल्याबाबतची तक्रार आदिवासी कर्मचारी संघटनेने मा.शालेय शिक्षण मंत्री व मा.आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच दि एज्युकेशन सोसायटी, अंबरनाथ या संस्थेने शासन निर्णय दिनांक १ ऑगस्ट २०१४ पूर्वी सरळसेवा व पदोन्नती झालेल्या अनुसूचित

जमातीच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दिनांक १ सप्टेंबर, १९९७ च्या शासन निर्णयानुसार बिंदूनामावली लागू केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार चुकीची व नियमबाह्यपध्दतीने बिंदूनामावली तयार करुन अनुसूचित जमातींच्या शिक्षकांवर अन्याय करणाऱ्या शिक्षणाधिकारी, जि.प. ठाणे यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे व सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अशा आशयाचे निवेदन दिले असल्याची बाब खरी आहे.
(२) हे खरे नाही.
(३) या प्रकरणी संबंधित शैक्षणिक संस्थेने त्यांच्या अंतर्गत शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मंजूर पदासाठी सा.प्र.वि. शासन निर्णय दि.२९.३.१९९७ तसेच दि.१९.१.२०१६ च्या प्रपत्र "अ" मध्ये प्रचलित असणारी बिंदूनामावली लागू केली असून त्याची प्राथमिक तपासणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, ठाणे यांच्या कार्यालयाकडून केली आहे. सदर बिंदूनामावलीची अंतिम तपासणी सहायक आयुक्त (मावक), कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडून करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भूलेश्वर व काळबादेवी, मुंबई येथील विनापरवाना सौंदर्य प्रसाधनांचे उत्पादन करणा-या कारखान्यांवर टाकण्यात आलेला छापा

**(५) * ७४८५० श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अन्न व औषधे प्रशासनाने भूलेश्वर व काळबादेवी परीसरातील विनापरवाना

सौदर्य प्रसाधनांचे उत्पादन करणा-या कारखान्यांवर छापा टाकून भुलेश्वर येथील कृष्णा कॉस्मेटीक्समधून रूपये २ कोटी ३८ लाख् ९० हजार ६४० रुपयांची व काळबादेवी येथील राधे कॉस्मेटीक्समधून १ लाख २२ हजार रुपयांची बनावट उत्पादने जप्त् केल्याचे तसेच मशीद बंदरजवळ एका कंपनीत छापा टाकून लोरियल, लॅक्मे, फेअर ॲण्ड लवली, ओले, रेव्हलॉन, एल१८, निविया यासारख्या नामांकित ब्रँडची बनावट उत्पादने आणि यंत्रे जप्त केली असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संबंधितांना औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यांतर्गत नोटीस पाठविली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने बनावट सौंदर्य प्रसाधने बनविणा-या कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, असल्यास, उक्त कारवाईनंतर मुंबईतील अन्य किती ठिकाणी छापे टाकण्यात आले आहेत व अशा किती कंपन्यावर कारवाई करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अन्न व औषध प्रशासनाव्दारे दि. ११ जानेवारी, २०१७ रोजी छापा टाकून नामांकित कंपन्यांची बनावट व विनापरवाना उत्पादित केलेल्या सौंदर्यप्रसाधनांचा साठा जप्त केला आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी कंपनीच्या वतीने कॉपीराईट ॲक्ट, १९६७ मधील कलम ५१ व ६३ च्या उल्लंघनाबाबत पायधुनी पोलीस स्टेशन, मुंबई येथे प्रथम खबर अहवाल क्र. ०४/२०१७, दि. १७/०१/२०१७ रोजी नोंदविलेला आहे. प्रशासनाच्या दि. १८/०१/२०१७ च्या पत्रान्वये सदरच्या आरोपींनी औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील उल्लंघन केलेल्या कलमातील तरतुदींचाही समावेश त्यांच्याविरूध्द पायधुनी पोलीस स्टेशन, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या प्रथम खबर अहवाल क्र. ०४/२०१७ यात करावा अशी विनंती करण्यात आली आहे.

छाप्याच्या वेळी विश्लेषणासाठी घेण्यात आलेल्या नमुन्यांचे अहवाल विश्लेषणासाठी पाठविण्यात आले आहेत. विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खर्डा (ता. जामखेड, जि. अहमदनगर) येथील किल्याच्या दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(६) * ७७०५५ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खर्डा (ता. जामखेड, जि. अहमदनगर) येथील किल्ल्याच्या दुरुस्तीचे पुरातत्व खात्यामार्फत सुरु असलेले रूपये ३५० कोटीचे काम कुशल कारागिराविना निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे दिनांक १९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठेकेदाराकडे कुशल कारागिर उपलब्ध नसून पुरातत्व खात्याने घालून दिलेल्या अटी व शर्ती याचे पालन संबंधित ठेकेदार कंपनीकडून होत नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे व त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित कंपनी विरुध्द व संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच किल्ल्याच्या दुरुस्तीचे काम योग्यरितीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

खर्डा किल्ला, खर्डा, ता. जामखेड, जि. अहमदनगर या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन दुरुस्तीकरीता १२ वा वित्त आयोगातून रु. १.०० कोटी, १३ वा वित्त आयोगातून रु. ५०.०० लक्ष व गड संवर्धन योजनेतून रु. ४.८४ कोटी इतकी रक्कम मंजूर करण्यात आली असून १२ वा वित्त आयोग व १३ वा वित्त आयोग मधील कामे पुर्ण झाली आहेत. गड संवर्धन योजनेतील कामे दि. ४.१.२०१७ रोजी सुरु करण्यात आली असून हे काम आवश्यक कुशल कारागिरांकडून करण्यात येत आहे. १२ वा वित्त आयोगातील काम निकृष्ट होत असल्याबाबत श्री. पांडुरंग मधूकर भोसले व इतर, शिव प्रतिष्ठाण, जामखेड यांनी दिलेल्या तक्रारीवरुन सदर कामाची अधिक्षक अभियंता दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नाशिक यांच्याकडून तांत्रिक तपासणी करुन घेण्यात आली असून बांधकामात वापरण्यात येणाऱ्या बांधकाम साहित्याचा चाचणी निष्कर्ष मानकाच्या मर्यादीत असल्याचे व कामाचा दर्जा समाधानकारक असल्याचा अहवाल सदर

कार्यालयाने दिनांक २५.११.२०१४ च्या पत्रान्वये दिला आहे.सबब याप्रकरणी निकृष्ट काम झालेले नसून ते पुरातत्व संकेतानुसार करण्यात येत आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**व्हीजेटीआय, माटूंगा (मुंबई) येथे अभियांत्रिकी शिक्षणाच्या विकासासाठी विस्तार योजना मंजूर करण्यात आल्याबाबत**

**(७) * ८०२६० श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माटूंगा येथील "विरमाता जिजाबाई टेक्निकल इंस्टिट्युट" (व्हीजेटीआय) मधील अभियांत्रिकी शिक्षणाच्या सर्वांगिण विकासासाठी शासनाने ४५० कोटी रुपयांची विस्तार योजना मंजूर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे एकूण स्वरुप काय आहे व किती कालावधीत ते पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) नाही

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भंडारा व गोंदिया जिल्हयातील धान वाहतूकीचे कामे अवैधरित्या जिल्हयाबाहेरील वाहतूकदारांना दिल्याबाबत**

**(८) * ८०४६९ श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा व गोंदिया जिल्हयात शासनाच्या वतीने दरवर्षी मार्केटींग फेडेरेशनतर्फे विकत घेतल्या जाणाऱ्या धानाची भरडाई राईस मिलमधून

केल्यांनतर तो तांदूळ जिल्हया बाहेरील गोदामात नेण्याकरीता भंडारा व गोंदिया जिल्ह्याबाहेरील वाहतूकदांराना प्रति टन रूपये २५०० या दराने अवैधरित्या काम दिल्यामुळे शासनाला प्रतिमाह दीड कोटी रूपयांचे नुकसान होत असल्याची माहिती दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आली, हे ही खरे आहे काय,

(२) तसेच जिल्ह्याबाहेरील क्युसीची अट शिथिल करून भंडारा जिल्ह्यातील राईस मिलर्सला लाभ मिळणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधिनी मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना दिनांक २७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत गोंदिया जिल्हा लोकल ट्रान्सपोर्ट असोशिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी गोंदिया व भंडारा जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचा तपशिल काय आहे

(५) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील नियतनासाठी देण्यात येत असलेला तांदूळ त्या जिल्ह्यातील निविदा प्रक्रीयेद्वारे विहित केलेल्या कंत्राटदारा मार्फत उचल केला जात आहे. सदर वाहतूक विहित दराने करण्यात येत असल्यामुळे शासनाचे नुकसान होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) व (३) होय.

(४) तांदुळाची वाहतूक विहित कंत्राटदारामार्फत व विहित दराने करण्यात येत असून शासकीय गोदामात तांदूळाचे नियमानुसार गुणवत्ता नियंत्रण केले जात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**किणे (ता.आजरा, जि.कोल्हापूर) गावातील नळ-पाणी**
**योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(९) * ७६४९६ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किणे (ता.आजरा, जि.कोल्हापूर) गावात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेअंतर्गत सुमारे १० लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी जि.प. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले असून संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आहे व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) होय

(३) होय.

याबाबत ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद, कोल्हापूर या कार्यालयाकडून चौकशी करणेत आलेली असून, यामध्ये अध्यक्ष व सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता समिती किणे, ता. आजरा हे दोषी आढळून आलेने त्याचेवर पोलीस ठाणे, आजरा येथे गुन्हा रजि.नं.११९/२०१६ अन्वये दि.९/९/२०१६ रोजी गुन्हा नोंद करणेत आला असून, त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोरेगाव (मुंबई) येथील पॅरा लॅब प्रयोगशाळेत अन्न व औषध**
**प्रशासनाने टाकलेला छापा**

**(१०) * ८१०९४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय औटी (पारनेर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुनिल शिंदे**

**(वरळी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (मुंबई) येथील पॅरा लॅब प्रयोगशाळेत देशामध्ये आयात केली जाणारी औषधे, प्रसाधने किंवा त्यांच्या कच्च्या मालाच्या नमुन्यांच्या चाचण्या सक्षम तांत्रिक व्यक्तींच्या अनुपस्थितीत अन्य व्यक्तींकडून केल्या जात असल्याचे तसेच विनाचाचण्या प्रमाणपत्रही तयार करण्यात येत असल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास छापा टाकला असता निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व संबंधितांवर तसेच उक्त लॅबवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) अन्न व औषध प्रशासनाव्दारे मे. पॅरालॅब प्रा.लि., गोरेगाव, मुंबई या प्रयोगशाळेची दि. २३/०१/२०१७ व दि. २५/०१/२०१७ रोजी तपासणी करण्यात आली. तपासणीच्यावेळी सदर पेढी प्रशासनाने पेढीस औषधांच्या चाचणीसाठी मान्यता दिलेल्या सक्षम तांत्रिक व्यक्तींच्या गैरहजेरीत इतर केमिस्टव्दारे औषधांच्या चाचणी करीत असल्याचे निदर्शनास आले.तसेच तपासणीदरम्यान पेढीत आढळलेल्या इतर त्रुटींच्या अनुषंगाने औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्याच्या तरतुदीनुसार पेढीचे परवाने दि. २३/०२/२०१७ पासून रद्द करण्यात आले आहेत.पेढीने कायद्यातील तरतूदीनुसार त्यावर शासनाकडे अपील दाखल केले असून सदर प्रकरणी शासनाने दि. १६/०२/२०१७ नुसार स्थगिती दिलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**मौजे गारवडे, रुवले,उधवने व कदमवाडी (नाटोशी) (ता.पाटण, जि.सातारा) या गावांतील नळ पाणी पुरवठा योजनांना निधी उपलब्ध होण्याबाबत**

**(११) * ७४९६५ श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गारवडे, रुवले,उधवने व कदमवाडी (नाटोशी) (ता.पाटण,जि.सातारा) या

गावांकरिता अस्तित्वात असलेल्या नळ पाणी पुरवठा योजना या कालबाह्य व नादुरुस्त झाल्याने सदरच्या योजनांना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेअंतर्गत मंजुरी देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नळ पाणी पुरवठा योजनांच्या अंदाजपत्रकास शासनाने मान्यता देऊनही, योजनेअंतर्गत निधी उपलब्ध न झाल्याने उक्त योजना प्रलंबित राहिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेअंतर्गत मंजुरी मिळूनही निधी उपलब्ध न झालेल्या उक्त नळ पाणी पुरवठा योजनांच्या कामांना मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेतून निधी उपलब्ध करून देणेबाबत उक्त गावांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त योजनांच्या कामांना मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेतून निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) होय.

(३) हे खरे नाही

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालेगांव व रिसोड (जि.वाशिम) तालुक्यातील प्रादेशिक पाणी पुरवठा योजना बंद असल्याबाबत

**(१२) * ८१६४६ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील मालेगांव तालुक्यातील चांडस +३, दुबळवेल+८ तसेच रिसोड तालुक्यातील करडा+२ चिंचाबाभर+४ या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनासह प्रस्तावित असलेल्या राज्यातील १३३ तालुका मुख्यालयांच्या ठिकाणी पाणी पुरवठा योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत एक विशेष बाब म्हणून मंजूर करण्याबाबत मा.केंद्रीय मंत्री पेयजल व स्वच्छता यांना मा.मुख्यमंत्री यांच्या स्तरावरून विनंती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनाचे विभाजन करुन प्रत्येक गावासाठी स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० जानेवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) नाही.

(२) अशंत: खरे आहे, उक्त प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील प्रत्येक गावासाठी मागणी केलेली नसून योजेनेतील शेवटच्या टोकावरील गावांसाठी मागणी केलेली आहे.

(३) याबाबत शासन परिपत्रक दिनांक २७/०६/२०११ नुसार प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील शेवटच्या टोकावरील गावांना स्वतंत्र पाणी पुरवठा योजना घेण्याबाबत परवानगी देण्यात आली होती. परंतु संबधित ग्रामपंचायतीकडून स्वतंत्र योजना करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण होवू शकली नाही. यास्तव उक्त बंद प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवनाबाबत दिनांक ०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील मुळा मुठा नदी प्रदूषण मुक्त करण्यासाठी केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध झाल्याबाबत

**(१३) * ८१८९५ श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयाच्या ग्रामीण भागाला शेतीसाठी पाणीपुरवठा करणाऱ्या मुळा मुठा नदी प्रदूषण निर्मुलनासाठी रूपये ९९० कोटी २६ लाखांचा निधी उपलब्ध झाल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नदी प्रदूषण मुक्त करण्यासाठी कोणती कार्यवाही केली व त्याची सद्यस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) राष्ट्रीय नदी कृति योजनेंतर्गत पुणे शहरातील मुळा-मुठा नदी संवर्धनाच्या अनुषंगाने सांडपाणी संकलन व प्रक्रिया यासाठी केंद्र शासनामार्फत रू. ९९०.२६ कोटी एवढ्या खर्चाचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे.
(२) मुळा-मुठा नदी संवर्धनाच्या मंजूर प्रस्तावात मलवाहिनी टाकणे, शहरातील विविध ११ ठिकाणी सांडपाणी (मैलापाणी) शुद्धीकरण केंद्र उभारणे, बोटॅनिकल गार्डन, शहरातील विविध ठिकाणी सार्वजनिक शौचालय, जनजागृती इ. कामे मंजूर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गालसुरे (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथे पेयजल योजनेंतर्गत पाणी पुरवठा करण्याबाबत

**(१४) * ८१३१७ श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गालसुरे (ता.श्रीवर्धन,जि.रायगड) ग्रामपंचायत भागामध्ये २० वर्षापूर्वी सुरु केलेल्या नळपाणी योजने अंतर्गत पाणी पुरवठा केला जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रानवली धरणापासून ते गालसुरे ग्रामपंचायतीपर्यंत जोडण्यात आलेल्या वाहिन्या जीर्ण झाल्यामुळे वारंवार फुटून पाणी वाया जात असल्याने अनेक वेळा पाणी पुरवठा खंडित होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०११ मध्ये शासनाने राबवलेल्या पेयजल योजने अंतर्गत गालसुरे ग्रामपंचायतीमध्ये काही प्रमाणात काम करण्यात आलेले असून उर्वरित कामे अपूर्ण ठेवण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त पेयजल योजने अंतर्गत अद्याप गालसुरे ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांना पाण्याचा पुरवठा करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त योजने अंतर्गत पाणी पुरवठा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय

(२) होय

(३) व (४) नाही

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत घेतलेल्या गालसुरे नळ पाणी पुरवठा योजनेतील सर्व उपांगाची कामे पूर्ण झाली असून या योजनेतून ग्रामस्थांना पाणी पुरवठा सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठ प्रशासनाने सीसीटीव्हीसाठी प्राप्त झालेला ७५ लाख रुपयांचा निधी वापरला नसल्याबाबत

**(१५) * ८१३७३ श्री.संजय पोतनीस (कलिना), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठ प्रशासनाने यावर्षीच्या अर्थसंकल्पात सीसीटीव्हीसाठी तरतुद करण्यात आलेला ७५ लाख रुपयांचा निधी अदयाप वापरला नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिक वर्ष संपत आले असल्यामुळे सदरहू निधी न वापरल्याने वाया जाण्याची शक्यता आहे, तसेच गेल्या वर्षीही सीसीटीव्हीसाठी राखीव असलेला एकूण २५ लाखांचा निधी न वापरल्याने वाया गेला होता,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई विद्यापीठ प्रशासनाच्या गैरकारभाराच्या अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीचे प्रदूषण रोखण्याकरिता नमामि पंचगंगा उपक्रम राबविण्याबाबत

**(१६) * ७४७२९ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी शहराजवळील पंचगंगा नदीत सांडपाणी आणि कचरा मिसळल्याने पाणी प्रदुषित झाले असून तेथील नागरिकांना दूषित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरातून गोळा होणारे सांडपाणी विना प्रक्रिया पंचगंगा नदीत सोडले जात असल्याने सदरच्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी बिलगेट फौंडेशनच्या माध्यमातून "नमामि पंचगंगा" हा उपक्रम राबविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी शहरातील बारा नाले अडविणे, त्यावर बंधारे घालून सांडपाणी प्रक्रिया केंद्राकडे वळविण्याच्या प्रस्तावाला अद्यापही मंजूरी देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (२) मधील उपक्रमाकरिता शासनाकडून अनुदान दिले जाणार आहे काय व सदरहू उपक्रम कशाप्रकारे राबविण्यात येणार असून सदर काम किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने नागरिकांना शुध्द पाणी देण्याच्या दृष्टीने व प्रस्तावाला मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.
पंचगंगा नदीतून उपसा केलेल्या पाण्यावर जल शुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया केल्यावरच पिण्यासाठी पाण्याचा पुरवठा केला जात असल्याचे इचलकरंजी नगरपरिषदेने कळविले आहे.

(२) असा कुठलाही प्रस्ताव शासनस्तरावर प्राप्त नाही.

• तथापि, इचलकरंजी नगरपरिषद हद्दीमध्ये तयार होणा-या ३२ द.ल.लि. सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी २० द.ल.लि. क्षमतेचे मलशुद्धीकरण केंद्र कार्यान्वित आहे.

• उर्वरित सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी १८ द.ल.लि. क्षमतेचे मलशुद्धीकरण केंद्र उभारण्याची कार्यवाही नगरपरिषदेमार्फत करण्यात येत आहे.

(३) नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी खालील कार्यवाही करण्यात येत आहे.

• कोल्हापूर शहरातील निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर राष्ट्रीय नदी कृतीयोजनेतून कसबा बावडा येथे उभारण्यात आलेल्या ७६ दशलक्ष लीटर क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पामध्ये प्रक्रिया करण्यात येते. याअंतर्गत जयंती नाला १०० टक्के अडवून प्रक्रिया केंद्राकडे वळविला आहे.

• सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेतून दुधाळी नाला येथे १७ द. ल. लि. क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बांधणेचे काम प्रगतीपथावर आहे.

• छोटया नाल्यांवर तत्काळ उपाययोजना म्हणून दगडी बंधारे बांधून ब्लिचिंग पावडरचा डोस देण्यात येत आहे.

• केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियांनातर्गत कोल्हापूर शहराच्या मलनिस्सारण प्रकल्पास, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. अमृत- २०१७/प्र.क्र. २७/नवि- ३३, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दि. ०८/०२/२०१७ अन्वये रू. ७२.४७ कोटी इतक्या निव्वळ किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर मंजूर प्रकल्पामध्ये दुधाळी झोनमध्ये ११२.९० कि. मी. ड्रेनेज लाईन, दुधाळी व कसबा बावडा येथे अनुक्रमे ६ व ४ द. ल. लि. क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, कसबा बावडा नाला अडविणे, वळविणे व शुध्दीकरण करणे तसेच उर्वरित नाल्यांवर फायटोराईड प्रक्रियेद्वारे नाल्यांतील सांडपाणी शुध्दीकरण करणे इ. प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डोलवी (जि.रायगड) येथील खाडीकिनारी जेएसडब्ल्यू कंपनीने खारफुटीची कत्तल करून जेटीचे बांधकाम केल्याबाबत**

**(१७) * ८१२५२ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील धरमतर जवळील डोलवी येथील खाडीकिनारी जेएसडब्ल्यू कंपनीने खारफुटीची कत्तल करून कोणतीही शासकीय यंत्रणा तसेच सक्षम प्राधिकरणाची परवानगी न घेता जेटीचे बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते श्री.सुरेंद्र ढवळे यांनी गत दोन वर्षापासून मा.बंदरे मंत्री, जिल्हाधिकारी रायगड तसेच गृह विभाग (बंदरे) यांच्याकडे तसेच स्थानिक ग्रामस्थांनी लेखी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारींनुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर व उक्त कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) धरमतर खाडीतील अस्तित्वातील जेट्टीचा विस्तार करण्यासाठी अतिरिक्त वॉटरफ्रन्ट मंजूर करण्यासंदर्भात महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने मे. जेएसडब्ल्यू धरमतर पोर्ट प्रा.लि. या कंपनीशी दि.०३.१२.२०१४ रोजी करारनामा स्वाक्षांकित केला आहे. तसेच, कंपनीने अस्तित्वातील जेट्टीच्या विस्तारासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथोरिटी आणि केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालय यांच्याकडून परवानग्या प्राप्त केल्या आहेत.

(२) अशा आशयाचे निवेदन शासन/महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे प्राप्त झालेले नाही. तथापि, जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार, खारफुटीच्या कत्तलीबाबत त्यांचे कार्यालयाकडे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(३) जिल्हाधिकारी, रायगड यांच्यामार्फत तक्रारींची वेळोवेळी दखल घेऊन चौकशी करण्यात आली आहे व सदर कंपनीविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मोझरी (ता. तिवसा, जि.अमरावती) येथे विज्ञान केंद्राची (सायन्स पार्क) निर्मिती करणेबाबत**

**(१८) * ७७२१५ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोझरी (ता. तिवसा, जि.अमरावती) येथे विज्ञान केंद्राची (सायन्स पार्क) निर्मिती करणेबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या अध्यात्मावर आधारित विज्ञानांचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी विज्ञान केंद्र निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मोझरी, ता. तिवसा, जि.अमरावती येथे विज्ञान केंद्र (सायन्स पार्क) ची निर्मिती करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक १८/११/२०१५ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे. या निवेदनाच्या अनुषंगाने शासन स्तरावर बैठका आयोजित करण्यात आलेल्या असल्याने निवेदनावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, ही बाब खरी नाही.
(२) व (३) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मोझरी विकास आराखड्यांतर्गत विकसीत झालेल्या दास टेकडी परिसरात विज्ञान केंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडून दिनांक २/९/२०१६ रोजी शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## करंजी (ता. आमगांव, जि. गोंदिया) येथील 'निर्मल भारत अभियान' व `स्वच्छ भारत मिशन' या योजनेतंर्गत झालेला गैरव्यवहार

**(१९) * ८०४४४ श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करंजी (ता. आमगांव, जि. गोंदिया) येथील 'निर्मल भारत अभियान' व `स्वच्छ भारत मिशन' या योजनेतंर्गत सन २०१२ ते २०१५ या कालावधीमध्ये शौचालयाच्या बांधकामासाठी आलेल्या रक्कमेमध्ये तत्कालीन सचिव अशोक उदयसिंग राठोड यांनी रूपये १४ लाखांचा अपहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थ्यांना उक्त योजनेतील अनुदान मिळाले नसल्याने याबाबत गटविकास अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) तसेच जिल्हाधिकारी (गोंदिया) यांच्याकडे तक्रारी करून माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान आमगांव पोलीस ठाण्यात सरपंच व सचिव यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अपहाराची रक्कम संबंधितांकडून वसूल करण्याबाबत व त्याच्यावर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) होय.

(३) निर्मल भारत अभियान, स्वच्छ भारत अभियान व मनरेगा या अंतर्गत सन २०१३-१५ या कालावधीत शौचालय बांधकाम करण्यात आले. चौकशी अंती ग्रामपंचायत ग्रामसेवक श्री. ए. यु. राठोड यांनी शौचालय बांधकामात गंभीर चुका केल्याचे निदर्शनास आले. तसेच सरपंच हे सुध्दा या गैरव्यवहारास जबाबदार असून त्यांनी कसुर केलेली असल्यामुळे श्री. ए. यु. राठोड, ग्रामसेवक यांच्यावर विभागीय चौकशी प्रस्तावीत करण्यात आलेली आहे. तसेच सरपंच श्रीमती पंचफुला बागडे यांच्यावर महाराष्ट्र ग्रा.पं. अधिनियम, १९५८ कलम ३९ अन्वये कार्यवाही प्रस्तावीत करण्यात आलेली आहे. याशिवाय ग्रामसेवक व सरपंच

यांच्यावर भारतीय दंड संहिता कलम ४०९ व ३४ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मेहकर (जि. बुलढाणा) येथील शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारातून नियमितपणे खिचडी मिळत नसल्याबाबत**

**(२०) * ८०२८३ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेहकर (जि. बुलढाणा) येथील अनेक गावात शालेय पोषण आहाराअंतर्गत देण्यात येणारी खिचडी विद्यार्थ्यांना नियमित मिळत नसून नोंदवहीवर जादा विद्यार्थी दाखवून अपहार होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुरबाड (जि. ठाणे) तालुक्यातील शिधापत्रिकाधारकांना स्वस्त धान्य उपलब्ध होत नसल्याबाबत**

**(२१) * ७७८२८ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरबाड (जि. ठाणे) तालुक्यात १९७ शिधावाटप दुकानदार असून त्यातील अनेक दुकानदारांच्या धान्य परमिटवर पाच ते सहा शिधावाटप दुकानदारांकडून शिधावाटपाचे धान्य भरले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिधावाटपाचे धान्य गोदामातून नेले जाण्याची नोंद असते परंतू शिधापत्रिकाधारकांना मात्र धान्यासाठी शिधावाटप दुकानांवर हेलपाटे घालावे लागत असून साखर, रॉकेल आदी वस्तू अनेक दुकानात मिळत नाही व तर काही दुकानांतून अनियमित धान्यपुरवठा होत असल्याची बाब दिनांक ३ जानेवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास¸ उक्त ठिकाणातील शिधावाटपाचे धान्य व रॉकेल यांचे दलांलामार्फत काळयाबाजारात विक्रि केली जात असून या काळयाबाजाराची चौकशी प्रत्येक दुकानात जाऊन करण्याची मागणी लाभार्थ्यांनी विकास मंच संस्थेच्या माध्यमातून मा. मुख्यमंत्री महोदयांकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात व उक्त निवेदनावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) हे खरे नाही, तथापि, तालुका मुरबाड जिल्हा ठाणे येथे एकूण १९६ रास्त भाव दुकाने मंजुर आहेत. दिनांक १४.०३.२०१६ व त्यानंतर केलेल्या तपासणीमध्ये दोषी आढळलेल्या ३ रास्त भाव दुकानांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. तसेच दिनांक ३.०९.२०१५ व त्यानंतर केलेल्या तपासणीमध्ये १०५१ लिटर केरोसीन जप्त करण्यात आले आहे. ४ किरकोळ केरोसीन परवानधारकाविरुध्द मुरबाड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून तीन परवानधारकांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत व एका परवानाधारकाचा परवाना रद्द करण्यात आला आहे.

(३) याबाबत कोणतेही निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## चंद्रपूर येथील पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोग शाळा बंद असल्याबाबत

**(२२) * ८१७७३ श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा विभागातील पाणी गुणवत्ता प्रयोग शाळा पाच वर्षापासून बंद असल्याचे माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पाणी गुणवत्ता प्रयोग शाळा बंद असण्याची कारणे काय आहेत तसेच पाण्याचे नमुने तपासण्यासाठी कोणती पर्यायी व्यवस्था करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील सिंहगड व राजगड किल्यांच्या संवर्धन कामात कंत्राटदाराकडून अनियमितता झाल्याबाबत

**(२३) * ८०९६१ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील सिंहगड व राजगड किल्यांच्या संवर्धन कामात कंत्राटदाराकडून अनियमितता झाल्याने तेथील कामे थांबविण्यात आली असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर किल्ल्यांवर सदोष कामे केलेल्या कंत्राटदाराकडून दंड वसूल करण्याबाबत व उक्त कामे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

सिंहगड किल्ला या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन- दुरुस्ती कामात अनियमितता असल्याची तक्रार मा. आमदार भीमराव तापकीर यांनी मा. जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे केल्यानंतर मा. जिल्हाधिकारी, पुणे यांच्यामार्फत इंजिनिअरींग कॉलेज, पुणे येथील तज्ञाची एकसदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली. सदर समिती तज्ञाने प्रत्यक्ष पाहणीनंतर सिंहगड किल्ल्याच्या जतन- दुरुस्ती कामात अनियमितता आढळून आल्याचा अहवाल मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना सादर केल्यानंतर सदर काम थांबविण्यात आले.

(२) विभागाने कंत्राटदारास काळया यादीत टाकले असून सिंहगड किल्ला, जि. पुणे या राज्य संरक्षित स्मारकावरील आजपर्यंत झालेल्या कामाचे पूर्ण देयक संबंधित कंत्राटदारास अदा करण्यात आले नसल्याचे दंड वसूल करण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाडा (जि.पालघर) येथील कोकाकोला कंपनीच्या सांडपाण्यामुळे पाणी दूषित झाल्याबाबत

**(२४) * ७५७८८ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित देशमुख (लातूर शहर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) येथील कोकाकोला कंपनीने आपले सांडपाणी व मुदत बाह्य झालेली शितपेये गावच्या नाल्यात सोडल्यामुळे बोअरवेलचे पाणी प्रदूषित होऊन नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे तसेच सदर पाणी शेतकऱ्यांच्या जमिनीत गेल्याने कडधान्याचे पीक देखील धोक्यात आले असल्याने सदर कंपनीवर कारवाई करण्याची मागणी येथील ग्रामस्थांनी तहसिलदार, वाडा यांचेकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार प्रदूषणास जबाबदार असणाऱ्या संबंधित कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार तसेच ग्रामपंचायत सदस्य व उद्योग प्रतिनिधी यांचेसमवेत दिनांक १०/०१/२०१७ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने स्थळभेट केली त्यानुसार :

- नाल्यातील/गटारीतील सांडपाण्याचे पृथ:करण केल्यानंतर त्या सांडपाण्यातील घटक आणि त्यांची मात्रा ही मे. हिंदुस्थान कोका कोला बेव्हरेजेस प्रा. लि. या उद्योगाकडून वापरण्यात येत असलेल्या रसायनांशी संबंधित नसल्याचे निष्पन्न झाले.
- सदर कंपनीमधून निघणारे सांडपाणी कंपनीबाहेर पडत नसल्याचे तसेच उल्लेखित शेत जमिनीत पिके घेत नसल्याचे तालुका कृषी अधिकारी, वाडा यांनी कळविलेले आहे.
- घटनास्थळी उद्योगाच्या आवारात सी.सी.टि.व्ही. कॅमेरा बसविण्याच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या त्यानूसार सी.सी.टि.व्ही. कॅमेरा बसविण्यात आला आहे.
- कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जुमडा-पेडगाव (ता.जि.हिंगोली) या गावातील पाणी पुरवठा योजना बंद असल्याबाबत

**(२५) * ७७०९९ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुमडा-पेडगाव (ता.जि.हिंगोली) या गावात गत दोन वर्षापासून पाणी पुरवठा नळ योजना बंद असल्याने या गावात तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांनी जिल्हाधिकारी, हिंगोली यांना दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त गावात पाणी पुरवठा नळयोजना सुरु करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे. प्रत्यक्षात सदर योजना सप्टेंबर, २०१६ पासून बंद होती.
(२) दि.०९.११.२०१६ रोजी वा त्या सुमारास मा.स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांनी जिल्हाधिकारी, हिंगोली यांना निवेदन दिल्याची तपासणी केली असता निवेदन प्राप्त झाल्याची नोंद आढळून येत नाही.
(३) सदर नळ योजना सुरु करण्यासाठी ग्रामपंचायतीने केबल, मोटार व किरकोळ दुरुस्ती करुन दि.०३.०३.२०१७ पासून पाणी पुरवठा सुरु केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गिरड (ता.भडगांव,जि.जळगांव) येथील राष्ट्रीय पेयजल योजनेतून मंजूर झालेली पाणी पुरवठा योजना अपूर्ण असल्याबाबत

**(२६) * ७७४०२ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गिरड (ता.भडगांव, जि.जळगांव) येथे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतून पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेसाठी १ कोटी ३३ लक्ष रूपयांचे अंदाजपत्रक असून व त्यावर संपूर्ण खर्च दाखवूनही सदर योजना आजतागायत अपूर्ण असून योजनेचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी अनेक वेळा तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर योजनेचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

सदर योजनेस रु.१,३२,३७,५००/- ढोबळ किंमतीस सन २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत मंजूरी प्राप्त असून योजनेचे काम ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती गिरड यांचे मार्फत करण्यात येत असून प्रगतीपथावर आहे. योजनेवर आतापर्यंत रु.१,१९,१३,७५०/- इतका निधी समितीस दिलेला आहे. योजनेतील आतापर्यंत झालेल्या कामांचा दर्जा चांगला आहे.

(३) योजनेतील वितरणव्यवस्था व किरकोळ कामे वगळता इतर कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत. योजनेची काम मे २०१७ अखेरपर्यंत पुर्ण करुन योजना ग्रामपंचायतीस देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतरीत करण्याबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) तालुक्यामधील एमआयडीसीतील कारखान्याच्या रसायनमिश्रित सांडपाण्याने होणारे प्रदूषण

**(२७) * ७६५६४ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) तालुक्यामधील एमआयडीसीतील रासायनिक कारखान्यांतून निघणा- ज्या सांडपाण्याचे सीईटीपीद्वारे शुध्दीकरण होऊन नंतर ते पाणी दुरवर आंबेत खाडीमध्ये सोडण्याचे आदेश असतानाही तेथील कारखान्यांनी शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन खाडीपट्ट्यातील नदीपात्रात दुर्गंधीयुक्त काळे पाणी सोडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाड एमआयडीसीच्या कार्यक्षेत्रात जे नवीन रासायनिक कारखाने आहेत त्यांनी प्रदूषित सांडपाणी सोडण्याबाबत विशेष खबरदारी घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कारखान्यातील रसायनमिश्रित सांडपाण्यामुळे शेत जमिन नापिक झालेली असून येथील पाण्याचे स्त्रोत देखील रसायनमिश्रित झाले असून तेथील अनेक नागरिक विविध आजारांनी ग्रस्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व संबंधित कारखान्यांवर व दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) तालुका कृषी अधिकारी, महाड यांच्या अहवालानुसार महाड एमआयडीसीच्या कार्यक्षेत्रात जमीन नापीक झाल्याबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही.

तालुका आरोग्य अधिकारी, महाड यांच्या अहवालानुसार, प्राथमिक आरोग्य केंद्र, चिंभावे व प्राथमिक आरोग्य केंद्र, दासगाव येथील आंतररूग्ण व बाह्यरूग्ण विभागाच्या तपासणीमध्ये तसेच आरोग्य कर्मचा-यांच्या गृहभेटीमध्ये कोणत्याही रोगाची लागण झालेले रूग्ण आढळून आलेले नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोहा (जि. नांदेड) तालुक्यातील अन्न सुरक्षा योजनेचे धान्य काळया बाजारात विकल्याबाबत

**(२८) * ८०७०६ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील शासनाकडून गोरगरीब कुटुंबासह शेतक-यांसाठी येणा-या अन्न सुरक्षा योजनेचे धान्य तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांना वितरित न करता परस्पर काळया बाजारात विकल्या प्रकरणी प्रभारी नायब तहसिलदार पापूलवार यांच्या चौकशीचे आदेश माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व उक्त आदेशानुसार करण्यात आलेल्या चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोलारी (ता. लाखनी, जि. भंडारा) येथील नळयोजनेच्या कामामध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत**

**(२९) * ८१८०५ श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोलारी (ता. लाखनी, जि. भंडारा) येथे भारत निर्माण योजनेअंतर्गत सन २०११-१२ मध्ये ५२ लाख रु. खर्च करुन केलेल्या नळयोजनेच्या अपुर्ण कामात संबंधीत कंत्राटदाराकडून अनियमितता आणि गैरव्यवहार झाल्याची तक्रार कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि. प. भंडारा यांचेकडे करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी तक्रारीची शहानिशा करुन अहवाल सादर करण्यासाठी उपविभागीय अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा (जि.प.) उपविभाग, भंडारा यांना कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र. भंजिप/ग्रापापुवि/लेखा/२३७/२०१६, दिनांक ०६ फेब्रुवारी २०१६ अन्वये कळविण्यात आले असून सदर योजनेसाठी रु. १७,४९,३६१ लक्ष एवढी रक्कम विनामुल्यांकनाने कोणतेही देयक सादर न करता योजनेच्या खात्यावर जमा केले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त योजनेच्या खात्यावर जमा केलेल्या रकमेची देयके सादर करण्यात आली आहेत काय,

(४) असल्यास, उक्त योजनेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, कोलारी यांना योजनेचा तिसरा हप्ता अग्रिम देताना, सदर कामाचे रु. १६.१३ लक्ष इतक्या रकमेचे मुल्यांकन सादर

करण्यात आले. त्यानुषंगाने नियमानुसार रु. १७,४९,५११/- इतकी रक्कम अग्रीम देण्यात आली.

(३) होय. देयक तयार आहे.

(४) प्राप्त तक्रारीस अनुसरुन केलेल्या चौकशीत तक्रारीत तथ्य आढळून आले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मीरारोड (जि.ठाणे) येथील रेतीबंदर-वरसावे मार्गावरील खाडीकिनारी फेमा ड्रेसिंग कॉर्पोरेशन कंपनीने अनधिकृतरित्या भूखंड ताब्यात घेतल्याबाबत**

**(३०) * ८०१३१ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरारोड (जि.ठाणे) येथील रेतीबंदर-वरसावे मार्गावरील खाडीकिनारी फेमा ड्रेसिंग कॉर्पोरेशन कंपनीने १ एकर जागेतील कांदळवनाची तोड करुन अनधिकृतरित्या भूखंड बळकाविल्याबाबत कॉर्पोरेशनच्या मालकांविरुध्द पर्यावरण संरक्षण कायद्याखाली माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान गुन्हा नोंद केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात सीआरझेड-१ मधील तिवरांची अवैध तोड करणाऱ्या संबंधित कॉर्पोरेशनच्या मालकांविरुध्द तहसिलदार कार्यालयास माहे मार्च, २०१६ मध्ये अहवाल पाठवण्यात आला असून त्यानुसार अद्यापही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार तिवरांची तोड करणाऱ्या कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अहवालानुसार मौजे वरसावे (ता.जि. ठाणे) येथील फेमस ड्रेझिंग कंपनीच्या मालकीच्या जागेलगत कंपनीने खाडीकिनारी अनधिकृत भराव करून कांदळवनाची झाडे गाडल्याचे निदर्शनास

आल्याने संबंधित कंपनीविरूद्ध जानेवारी,२०१७ मध्ये पर्यावरण कायदा,१९८६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील मुलींकरीता ४३ शहरांमध्ये सुसज्ज वसतिगृहे बांधण्याबाबत

**(३१) * ७७२९५ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील मुलींना उच्च शिक्षण घेता यावे याकरिता ४३ शहरांमध्ये सुसज्ज वसतिगृहे बांधण्याचा निर्णय अल्पसंख्यांक विकास विभागाने दिनांक २ मार्च, २०१० रोजी घेतला मात्र गेल्या ६ वर्षात केवळ १० वसतीगृहांची कामे पूर्ण झाल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित वसतिगृहे न बांधण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त वसतिगृह बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी प्रत्येक जिल्हयात वसतीगृह बांधण्यास दि. २.३.२०१० च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच राज्यातील विद्यापीठांच्या जागेवर अल्पसंख्याक मुलींसाठी वसतीगृह सुरू करणेसंदर्भात शासन निर्णय दि.२०.१२.२०११ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्याचबरोबर केंद्रपुरस्कृत बहुक्षेत्रीय विकास कार्यक्रमांतर्गत देखील वसतीगृह बांधण्यात येत आहेत. आतापर्यंत एकूण १८ ठिकाणी वसतीगृह कार्यान्वित झाली आहेत.

(२) व (३) अद्‌याप २३ वसतीगृहांची बांधकाम प्रक्रिया सुरु असून बांधकामाच्या प्रगतीनुसार टप्प्याटप्प्याने निधी देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भातकुली (जि.अमरावती) तालुक्यातील विश्रोळी -१०५ गावे योजनेतील गावांना अल्प व अनियमीत पाणी पुरवठा होत असल्याबाबत

**(३२) * ७७२८६ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातकुली (जि.अमरावती) तालुक्यातील म.जि.प्रा. अतंर्गत विश्रोळी -१०५ गावे योजनेमध्ये टाकरखेडा संभु या गावाचा समावेश असून योजना कार्यान्वित झाल्या पासून सदर गावाला अल्प व अनियमीत पाणी पुरवठा होत असल्यामुळे येथील पेयजलाची समस्या कायम आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावाला पाणी वितरणाची जबाबदारी असलेल्या कर्मचा-यांवर कोणतेच नियंत्रण नसल्यामुळे अनेक ठिकाणी पाणी चोरी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजने अंतर्गत अनियमित होत असलेला पाणी पुरवठा नियमित करणेसाठी व उक्त गावाला नियमित पाणीपुरवठा व पाणी चोरी रोखण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री, मा.उद्योग राज्यमंत्री व मा. पर्यावरण राज्यमंत्री यांना दिनांक २७ एप्रिल,२०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आहे व उक्त निवेदनाच्या अनुषंगाने नियमित पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

विश्रोळी १०५ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील टाकरखेडा शंभु या गावाला नियमित पाणी पुरवठा सुरु आहे. तथापि, गावातील उंच भागात कधीकधी पुरेशा दाबाने पाणी पुरवठा होत नसल्याने किंवा पाईपलाईन लिकेजेस उद्भवल्यास कधी कधी गावक-यांना अनियमित पाणी पुरवठा होतो.

(२) सदर योजनेच्या देखभाल व दुरुस्तीचे काम खाजगी कंत्राटदारामार्फत करण्यात येत आहे. नियुक्त कर्मचा-यांवर योग्य नियंत्रण व समन्वय ठेवूनच, वैयक्तिक नळजोडणीद्वारे जलमापक यंत्र लावूनच संपुर्ण गावाला पाणी पुरवठा

करण्यात येतो. तथापि, अवैध नळ जोडण्या आढळून न आल्यामुळे पाणी चोरीचा प्रश्न उद्‌भवत नाही. .

(३) व (४) सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनधी यांचेमार्फत मा. मंत्री महोदयांना लेखी निवेदन दिल्याचे आढळून येत नाही.

तथापि, गावातील काही उंच भागात पुरेशा दाबाने पाणी पुरवठा होण्याकरीता, सन २०१६-१७ च्या पाणी टंचाई कृती आराखडयात टाकरखेडा संभु या गावाचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार, प्रस्तावात पाईप लाईन व व्हॉल्वची तरतुद करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयात सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोडकळीस आलेल्या वर्ग खोल्या व स्वच्छतागृहाच्या बांधकामाबाबत

**(३३) * ७७५२५ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोडकळीस आलेल्या वर्ग खोल्यांसाठी २ कोटी ८० लाख ८० हजार रुपयांची तरतूद केली आहे तर स्वच्छतागृहांसाठी १ कोटी २० लाख ७५ हजार रुपये मंजूर असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त एकाही वर्ग खोल्यांचे बांधकाम सुरु झाले नसल्याने निधी अखर्चित राहिला असून विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अद्याप निधी खर्च न करण्याची कारणे काय आहेत, सदर कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.

हिंगोली जिल्हयात सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोडकळीस आलेल्या वर्गखोल्या व नवीन वर्गखोल्या यासाठी रू.२ कोटी ८० लाख ८० हजार इतकी तरतूद केली आहे.

(२) निधी अखर्चित राहिल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये याबाबत दक्षता घेण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील सात नामांकित खाजगी रुग्णालयांवर वैध मापनशास्त्र विभागाने विशेष मोहिम राबवून कारवाई केल्याबाबत**

**(३४) * ७७९६८ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.सुरेश लाड (कर्जत), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), अॅड.भीमराव धोंडे (आष्टी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील लीलावती रूग्णालय, फोर्टीज रूग्णालय, कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रूग्णालय, एशियन हार्ट इन्स्टिटयूट, ग्लोबल रूग्णालय, हिरानंदानी रूग्णालय आणि सर एच एन रूग्णालय व नामाकिंत रूग्णालय व्यवस्थापन, प्रशासनाने वैध मापनशास्त्र अधिनियमातील नियमाचा भंग करून रूग्णालयात उपचारासाठी वापरण्यात येणा-या बलून डिव्हाइस, एंजोग्राफिक कॅथेटर, युरेटीक युरोवल्ड, आयवी कॅथेटर, गाईड वायर, बेथ्रिक सर्किट, हॅनसॅन ग्लोज, ब्लड कलेक्टर इत्यादी वस्तूंची छापील किंमतीपेक्षा वाढीव दराने विक्री केल्याबददल राज्याच्या वैध मापनशास्त्र विभागाने उक्त रुग्णालयांवर कारवाई केली असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील अनेक वैद्यकीय रूग्णालयांमध्ये वापरण्यात येणाऱ्या आयव्ही कॅथेटर आवेष्टित उपकरणे व वस्तुंवरील घोषित केलेल्या किंमती व छापील माहितीमध्ये खाडाखोड करून अनेक रूग्णांची रूग्णालयांकडून फसवणूक केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त रुग्णालयांच्या व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) मे.फोर्टीस हॉस्पीटल भांडूप, मुंबई यांचेविरुध्द एक आवेष्टित वस्तू फॅब्रिल नॅचरल फायबर १०० ग्रॅ. वरील किंमतीत खाडाखोड केल्याबद्दल व मे.ब्रीच कँडी हॉस्पीटल यांचेविरुध्द बँडेज रोल पॅकेज व कॉटन क्रिप बँडेज या आवेष्टीत वस्तूवरील किंमतीत बदल केल्याबाबत खटले दाखल केले आहेत.

वैधमापन शास्त्र यंत्रणेने उक्त उल्लंघनाबाबत वरील रुग्णालये व इतर उल्लंघनाबाबत मे.लिलावती हॉस्पीटल, बांद्रा, मे.कोकिलाबेन धिरुभाई अंबानी हॉस्पीटल, अंधेरी, मे.एशियन हार्ट इन्स्ट्यिूट, बांद्रा, मे.ग्लोबल हॉस्पीटल, परेल, मे.डॉ.एल.एच.हिरानंदानी हॉस्पीटल, पवई, मे. सर एच.एन.हॉस्पीटल(रिलायन्स फाऊंडेशन) यांचेविरुध्द खटले दाखल केले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाठोडा शुक्लेश्वर, (ता.भातकुली, जि.अमरावती) येथे मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रमाअंतर्गत स्वतंत्र पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत

**(३५) * ८१९३७ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाठोडा शुक्लेश्वर (ता.भातकुली, जि.अमरावती) येथे मा.मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रमाअंतर्गत स्वतंत्र पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांना दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, सदर योजनेचा मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत रु.९३.८८ लाख इतक्या किमंतीचा प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीसाठी शासनास दि.२२.०२.२०१७ रोजी प्राप्त झाला आहे. त्यानुसार सदर योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यापुर्वी प्रधान सचिव यांचे अध्यक्षतेखालील तांत्रिक समितीसमोर सादरीकरणाकरिता ठेवण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.